**मे. वसुधा अलॉयज प्रा.लि., गट नं. ८६, गाव खादगाव, ता. बदनापूर, जि. जालना या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये टीएमटी बार ५,००० एमटीएम ते ३०,००० एमटीएम उत्पादन करणे व प्रस्तावित नविन एमएस बिलेटस ३०,००० एमटीएम क्षमतेचे युनिट उभारणी उत्पादन करणे बाबत दिनांक २१/०९/२०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता मे. वसुधा अलॉयज प्रा.लि., गट नं. ८६, गाव खादगाव, ता. बदनापूर, जि. जालना येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त :-**

---

मे. वसुधा अलॉयज प्रा.लि., गट नं. ८६, गाव खादगाव, ता. बदनापूर, जि. जालना बाबत या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये टीएमटी बार ५,००० एमटीएम ते ३०,००० एमटीएम उत्पादन करणे व प्रस्तावित नविन एमएस बिलेटस ३०,००० एमटीएम क्षमतेचे युनिट उभारणी उत्पादन करणे बाबत दिनांक २१/०९/२०२३ रोजी सकाळी ११:०० वाजता मे. वसुधा अलॉयज प्रा.लि., गट नं. ८६, गाव खादगाव, ता. बदनापूर, जि. जालना येथे पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-६०/ २०२३ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २३०८२२- एफटीएस-०२२४ दि. २२/०८/२०२३ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **श्री. केशव नेटके**<br>अप्पर जिल्हादंडाधिकारी, जालना. | : | अध्यक्ष |
| २. | **श्री. सुजित ढोलम,**<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजी नगर. | : | सदस्य |
| ३. | **श्री. सो. म. कुरमुडे,**<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, जालना. | : | समन्वयक |

श्री. रविंद्र जाधव, क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जालना यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, आज आपण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे मे. वसुधा अलॉयज प्रा.लि., गट नं. ८६, गाव खादगाव, ता. बदनापूर, जि. जालना यांच्या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये टीएमटी बार ५,००० एमटीएम ते ३०,००० एमटीएम उत्पादन करणे व प्रस्तावित नविन एमएस बिलेटस ३०,००० एमटीएम क्षमतेचे युनिट उभारणी उत्पादन करणे बाबत पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी जमलेलो आहोत. सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार 'ब' वर्गात मोडतो. ज्यास पर्यावरण

विभाग, मंत्रालय, मुंबई यांची पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. मे. वसुधा अलॉयज प्रा.लि. यांचा पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी घेण्यासाठी म.प्र.नि. मंडळाकडे अर्ज दिं. १३/०७/२०२३ रोजी प्राप्त झाला. त्याअनूषंगाने मा. जिल्हाधिकारी जालना यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दिं. २१/०९/२०२३ वेळ-सकाळी ११.०० वा. निश्चित करण्यात आली. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दिं. १७/०८/२०२३ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या, त्याची यादी खालीलप्रमाणे-

१. जिल्हाधिकारी कार्यालय, जालना.
२. जिल्हा परिषद, जालना.
३. जिल्हा उद्योग केंद्र, जालना.
४. महानगरपालिका, जालना.
५. तहसिलदार, तहसिल कार्यालय, जालना.
६. ग्रामपंचायत कार्यालय, खादगाव, दावलवाडी, ता.जि. जालना.
७. उप प्रादेशिक कार्यालय,म.प्र.नि.मंडळ, प्लॉट नं. पी-३/१ व पी-३/२, अतिरीक्त एमआयडीसी फेज-२, जालना.
८. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा छत्रपती संभाजी नगर.
९. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
१०. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
११. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

तसेच त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, जालना येथे खालीलप्रमाणे सूचना/आक्षेप प्राप्त झालेले आहेत (प्रत सोबत)-

१. श्री. परमेश्वर गरबडे, शिवभिम आर्मी महाराष्ट्र, जालना यांचा आक्षेप दिं. ०८/०९/२०२३ रोजी प्राप्त.
२. श्री. सुनंदा रेडडी, तेलंगना, यांची सूचना दिं. १०/०९/२०२३ रोजी प्राप्त.
३. सौ. वत्सलाबाई जाधव, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय दावलवाडी, ता. बदनापूर, जि. जालना यांचा आक्षेप अर्ज दिं. १८/०९/२०२३ रोजी प्राप्त. तदनंतर दिं. २०/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकल्पाबाबतचा आक्षेप मागे घेवून प्रकल्पास समर्थन दिले.
४. श्री. शिवाजी गंगाराम साबळे व इतर, खादगाव, ता. बदनापूर, जि. जालना यांचा आक्षेप अर्ज दिं. १८/०९/२०२३ रोजी प्राप्त.
५. श्रीमती सरस्वती पवार व इतर, नागेवाडी, ता. जि. जालना यांचा प्रकल्पास समर्थन बाबत अर्ज दिं. २०/०९/२०२३ रोजी प्राप्त.

६. श्री. विकास कदम व इतर, दावलवाडी, ता. बदनापूर, जि. जालना यांचा प्रकल्पास समर्थन बाबत अर्ज दिं. २०/०९/२०२३ रोजी प्राप्त.
७. श्री. युवराज नाईकवाडे व इतर, खादगाव, ता. बदनापूर, जि. जालना यांचा प्रकल्पास समर्थन बाबत अर्ज दिं. २०/०९/२०२३ रोजी प्राप्त.
८. श्री. अर्जून नाईकवाडे व इतर, खादगाव, ता. बदनापूर, जि. जालना यांचा प्रकल्पास समर्थन बाबत अर्ज दिं. २०/०९/२०२३ रोजी प्राप्त.
९. श्री. रंगाराव कोठाकोंडा, सेव अर्थ, तेलंगना, यांची सूचना दिं. २१/०९/२०२३ रोजी प्राप्त.

तरी उपस्थित नागरिकांमधून कोणास कांही लेखी/तोंडी आक्षेप/टिका/टिप्पणी नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात.

त्यानंतर श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, जालना तथा समन्वयक पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी यांनी सर्वप्रथम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे आजूबाजूच्या गावातील उपस्थित सर्व नागरिकांचे स्वागत केले. तसेच पूढे त्यांनी, श्री. रविंद्र जाधव, क्षेत्र अधिकारी यांनी अगोदर सांगितल्याप्रमाणे आक्षेप/टिका/टिप्पणी बाबत थोडक्यात विषद केले. तसेच त्यांनी उपस्थित नागरिकांना विनंती केली की, अजूनही आपले काही आक्षेप/टिका/टिप्पणी असतील तर ते आपण प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर विचारावेत. तदनंतर त्यांनी, सदर प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

मे. श्री साई मानसा नेचर टेक प्रा.लि., हैद्राबाद, श्री. राजेश मानकर, प्रकल्प सल्लागार यांचे प्रतिनिधी यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी. सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डीग करण्यात आली असून संक्षिप्तामध्ये इतिवृत्तात नोंद करण्यात आली आहे.

प्रकल्प सल्लागारांनी सदर प्रकल्पाचे पॉवर पॉईंट सादरीकरण समाप्त केल्यानंतर श्री. सो. म. कुरमुडे, यांनी, उपस्थित नागरिकांना विनंती केली की, आपले जे काही प्रश्न आक्षेप/टिका/टिप्पणी असतील तर प्रथमता आपले नाव व गावाचे नाव सांगून आणि पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत.

त्यानंतर प्रस्तावित प्रकल्पाबाबत खालील प्रमाणे सूचना/हरकती/आक्षेप इत्यादी प्राप्त झाले. त्याचे प्रकल्प व्यवस्थापकाच्या वतीने त्यांचे सल्लागार/प्रतिनीधी यांनी दिलेले उत्तर/आश्वासन खालीलप्रमाणे आहेत-

| **अ.क्रं.** | **केलेले टिका टिप्पणी, आक्षेप, सुचना मुददा इत्यादी व उपस्थित व्यक्तिचे नांव.** | **उदयोगाच्या प्रतिनिधीने/ प्रकल्प सल्लागार यांनी दिलेले आश्वासन / उत्तर.** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | **श्री. सोपान गोपीचंद नाईकवाडे, सरपंच खादगाव** यांनी सर्वप्रथम उपस्थित अधिकारी, कर्मचारी व सर्व नागरिकांचे स्वागत करत सांगितले की, नविन नविन प्रकल्पामूळे नक्कीच बेरोजगारी कमी होईल, गावातील स्थानिक नागरिकांना रोजगार उपलब्ध होईल. अशा प्रकल्पाचे नेहमी स्वागतच आहे. परंतू प्रकल्पाच्या आजूबाजूला असलेले शेतकरी यांचे नूकसान होण्याची श्यकता आहे. या प्रकल्पामूळे आजूबाजूच्या शेतक-याचे नूकसान, हानी होणार नाही यासाठी कंपनीने कंपनीमधून निघणा-या धूरासाठी काय काय उपाययोजना केलेल्या आहेत. जेणे करून शेतक-यांचे नूकसान होणार नाही तसेच कंपनी प्रवर्तकांना कंपनी चालवणे सोईस्कर होईल. | **यावर प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की,** सदरच्या प्रकल्पामध्ये प्रायमरी आणि सेकंडरी एअर सक्शन सयंत्रणा तसेच बॅग फिल्टर व चिमणी अशी अत्याधुनिक हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बसविण्यात येणार आहे आणि बॅग फिल्टरचा वापर करून, निर्माण होणारी धूळ वेगळी केली जाईल आणि शुद्ध हवा वातावरणात जाईल. त्यामूळे आजूबाजूच्या शेतक-यांनी अश्वस्त रहावे. तसेच व्यवस्थापन योजनाद्वारे वेळोवेळी यावर लक्ष दिले जाईल. |
| २. | **श्री. ज्ञानदेव शिवाजी साबळे, रा. खातगाव, ता. बदनापूर, जि. जालना** यांनी सांगितले की, एक लेखी आक्षेप अर्ज आम्ही अगोदर दिलेला आहे. तसेच आमचे शेत प्रकल्पापासून ५०० मीटरच्या अंतरावर आहे. या प्रकल्पामूळे मोठया प्रमाणात प्रदूषण होणार आहे यासाठी कंपनीने आजूबाजूच्या कडेला वृक्षारोपण करणार आहेत असे आश्वासन दिलेले आहे परंतू अद्याप झाडे लावलेली नाही व पूढे याची काय हमी आहे की ते झाडे लावतील. तसेच भविष्यात प्रदूषण होवू नये व प्रदूषणामूळे शेतक-यांना याचा त्रास होवू नये यासाठी पूरेपूर काळजी घेण्यात यावी व योग्य त्या उपाययोजना करण्यात याव्या. पूढे पर्यावरणाविषयी काही हानी झाल्यास त्याची भरपाई बाबत श्वासती दयावी अशी विनंती त्यांनी केली. | **यावर प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की,** आपल्या सूचनांची येथे नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच वृक्षारोपणाबाबत सादरीकरणामध्ये दाखविल्याप्रमाणे हरित पटटा विकासची कामे करण्यात येणार आहेत. तीन वर्षामध्ये हरित पटटा विकास केला जाईल ज्यामध्ये प्रकल्पाच्या आत व बाहेरच्या बांउड्री वॉलच्या बाजूला तसेच रस्त्याच्या बाजूला ग्रामपंचायत सोबत बैठक घेवून झाडे लावणार आहोत. तसेच जड वाहनांच्या वाहतूकीमूळे धूळ निर्माण होवू नये यासाठी टँकरद्वारे पाण्याचे शिंपडण वेळोवेळी करण्यात करण्यात येईल. त्यामूळे धूळीचे प्रदूषण होणार नाही. तसेच प्रकल्पामधून कूठल्याही प्रकारचे प्रदूषित पाणी निघणार नाही. |
| ३. | **श्री. विकास वसंतराव कदम, रा. दावलवाडी, ता. बदनापूर. जि. जालना** यांनी सांगितले की, या प्रकल्पाचे स्वागतच आहे. जालना एमआयडीमध्ये जसे फेज-१, फेज-२ व फेज-३ येथे मोठया प्रमाणात उद्योग आहेत तसेच दरेगाव व नागेवाडी शिवारामध्ये देखील उद्योग आहेत यामूळे अशे प्रकल्प गावामध्ये यायला हवेत कारण यामूळे शेतक-यांच्या मूलांना येथे | **यावर प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की**, सदर प्रकल्पामध्ये प्रक्रियेदरम्यान कूठल्याही प्रकारचे सांडपाणी निर्मिती होणार नाही. तसेच कंपनीतील कामगार, कर्मचारी तसेच इतर स्टाफ वर्ग यांच्यामूळे निर्माण होणारे घरगूती सांडपाणी यासाठी Sewage Treatment Plant ( STP) बसविण्यात येणार आहे, यामध्ये सदरचे सांडपाणी प्रक्रिया करून ते हरित पटटयासाठी वारण्यात येणार आहे. त्यामूळे |

| | | |
|---|---|---|
| | रोजगाराची संधी अगोदरही मिळालेली आहे. तसेच या प्रकल्पामूळे देखील रोजगार मिळेल. तसेच त्यांनी विचारले की, प्रकल्पातून निर्माण होणारे सांडपाण्यावर काय उपाययोजना केल्या जातील. | प्रकल्पामधून कुठलेही सांडपाणी प्रकल्पाच्या बाहेर जाणार नाही. |
| ४. | **श्री. सो. म. कुरमुडे,** उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, जालना तथा समन्वयक पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी यांनी विचारले की, प्रकल्पाच्या सादरीकरणामध्ये ले आउट प्लान मध्ये Sewage Treatment Plant (STP) चा उल्लेख दर्शविण्यात आलेला नाही. याबाबत स्पष्टता देण्यात यावी. | **यावर प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की,** Sewage Treatment Plant (STP) बाबत प्रक्रिया प्रवाह दर्शविले आहे. परंतू उल्लेख केलेला नाही. सदर बाबत लेआउट मध्ये अंतर्भूत करून घेण्यात येईल. |
| ५. | **श्री. विठल भाउसाहेब पडूळ, रा. खातगाव, ता. बदनापूर, जि. जालना** यांनी विचारले की, सदरची जनसूवानणी ही आजूबाजूच्या शेतक-यांसाठी आहे की इतर जनतेसाठी. सदर सूनावणीबाबत आम्हाला कूठलीही नोटीस मिळालेली नाही. पूढे त्यांनी सांगितले की, सदर प्रकल्पाबाबत आमची मंजूरी नसून याबाबत आक्षेप नोंदविलेला आहे व सदरच्या स्टिल प्रकल्पामूळे आजूबाजूच्या शेतक-यांचे नूकसान होत आहे तसेच पूढे देखील होणार आहे यासाठी प्रकल्प प्रवर्तकांने शेतक-यांना याबाबत मोबदला दिलेला नाही. | **यावर श्री. सो. म. कुरमुडे,** उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, जालना यांनी सांगितले की, सदरची जनसूनावणी ही पर्यावरण विषयक आहे त्यामूळे आपण येथे पर्यावरणाविषयी प्रश्न विचारावेत. तसेच पूढे नोटीस बाबत त्यांनी सांगितले की, पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दिं. १७/०८/२०२३ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालयामध्ये माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या. तसेच त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देखील देण्यात आलेली होती. |
| ६. | **श्री. व्ही. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, तेलंगणा** यांनी प्रकल्प व्यवस्थापनाला शुभेच्छा आणि समर्थन दिले. तसेच या उद्योगाला बिनशर्त पर्यावरणीय मंजुरीसाठी MoEF&CC कडे शिफारस करत असल्याचे नमूद केले. | **यावर श्री. सो. म. कुरमुडे,** उप प्रादेशिक अधिकारी, जालना यांनी याबाबत सांतिले की, आपल्या सूचनांची लिखीत नोंद घेण्यात आलेली आहे. |
| ७. | **श्री. अर्जून नानासाहेब नाईकवाडे, रा. खातगाव, ता. बदनापूर, जि. जालना** यांनी विचारले की, दरवर्षी वृक्षारोपण करण्यात येणार आहे का. | **यावर प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की,** तीन वर्षाच्या आतमध्ये वृक्षारोपण पूर्ण होणार आहे. |

| | | |
|---|---|---|
| ८. | **श्री. शिवम कैलास शिंदे, रा. दावलवाडी, ता. बदनापूर, जि. जालना** यांनी विचारले की, सदरच्या प्रकल्पामूळे आजूबाजूच्या गावांना कसा फायदा होणार आहे. | **यावर प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की,** सदर प्रकल्पामूळे निश्चितच रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. सद्यस्थितीत असलेल्या प्रकल्पामध्ये एकूण १०० मनूष्यबळाची गरज आहे तसेच प्रस्तावित नविन प्रकल्पामध्ये एकूण २०० वाढीव मनूष्यबळ लागणार आहे. तसेच रोजगारामध्ये जवळच्या गावातील नागरिकांना प्राधाण्य राहील. तसेच सामाजिक उपक्रमाद्वारे गावातील विविध समस्या सोडविण्याचे काम देखील करण्यात येतील. यामूळे आजूबाजूच्या नागरिकांना तसेच गावांना यांचा नक्कीच फायदा होणार आहे. |
| ९. | **श्री. नितीन कदम, रा. दावलवाडी, ता. बदनापूर, जि. जालना** यांनी विचारले की, प्रकल्पामूळे निर्माण होणा-या ध्वनी प्रदूषणावर काय काय उपाययोजना केलेल्या आहेत. | **यावर प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की,** सदर प्रकल्पामध्ये आवाज निर्माण होईल अशी उपरणे राहणार नाहीत. तसेच जो काही थोडयाप्रमाणात आवाज निर्माण होईल त्यासाठी ध्वनी रोधक आवरण (Acoustic Enclosure) बसवण्यात येईल जेणेकरून होणारा आवाज कंपनीच्या आवाराच राहील व तो बाहेर जाणार नाही. |
| १०. | **श्री. पंढरीनाथ जगन्नाथ नाईकवाडे, रा. खातगाव, ता. बदनापूर, जि. जालना,** यांनी सांगितले की, आमची शेती कंपनीच्या बाजूलाच असून सद्यस्थितीत असणा-या प्लांटमूळे अगोदरच शेतीचे नूकसान झालेले आहे. याबाबत कंपनीने कूठल्याही प्रकारचा मोबदला दिलेला नाही. तसेच सदर नविन प्रस्तावित प्रकल्पाच्या प्रदूषणामूळे यापेक्षा जास्त नूकसान होणार आहे. सद्यस्थितीच्या असलेल्या प्रकल्पाच्या चिमणीमधून धूर न निघता आजूबाजूने धूर निघतो त्यामूळे शेतीचे नूकसान होत आहे. याबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी शेतीचे नूकसान होणार नाही ते सांगावे. यामूळे सदर प्रकल्पाला आम्हा सर्व शेतक-यांचा स्पष्ट नकार आहे, असे सांगितले. | **यावर श्री. सो. म. कुरमुडे,** उप प्रादेशिक अधिकारी, जालना यांनी याबाबत सांतिले की, आपल्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ११. | **श्री. सुनिल शिवाजी साबळे, रा. खातगाव, ता. बदनापूर, जि. जालना,** यांनी सांगितले की, आपण सांगितल्याप्रमाणे ऑनलाईन नोटीस देण्यात आली होती. परंतू शेतक-यांची मूलं एवढी शिकलेली नसल्यामूळे ऑनलाईन नोटीस बघू शकतं नाही. येथे ग्रामपंचायत सरपंच, सदस्य उपस्थित असून त्यांनी देखील आम्हाला दोन दिवसापूर्वी या लोकसूनावणीबदल सांगितले आहे. जर खरच प्रदूषण नियंत्रणात आले असते तर देशाची प्रदूषणाची आकडेवारी वाढली नसती. कोव्हिडमध्ये सदर उद्योग बंद असल्यामूळे प्रदूषण पातळी कमी झाल्याचे दिसून आले. सदर प्रकल्पास विरोध नसून सदर प्रकल्पामूळे आमचे नूकसान होणार आहे. प्रकल्प धारकाने १० कि.मी. चा सर्व्हे केला असे सांगता परंतू आमच्या शेतामध्ये येवून कोणी पाहणी केली नाही. सद्यस्थितीत चालू असलेल्या उद्योगामध्ये पर्यावरण विषयक उपाययोजना केलेल्या आहेत का याबाबत सांगावे. | **यावर श्री. सो. म. कुरमुडे**, उप प्रादेशिक अधिकारी, जालना यांनी याबाबत सांतिले की, आपल्या सूचनांची लिखीत नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच आपण या ठिकाणी पर्यावरण विषयक मुद्दे नमूद करावे असे सूचित केले.<br><br>पूढे यावर प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, सदर प्रकल्पामूळे आजूबाजूच्या शेतक-यांच्या शेतीचे नूकसान होणार नाही याची दक्षता घेवूत तसेच सदर प्रकल्पामूळे कूणाला त्रास होणार याची खात्रीसूध्दा त्यांनी दिली. |

श्री. केशव नेटके, अव्वर जिल्हादंडाधिकारी जालना तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी यांनी सांगितले की, आज आपण मे. वसूधा अलॉयज प्रा.लि. या प्रकल्पाच्या प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये टीएमटी बार ५,००० एमटीएम ते ३०,००० एमटीएम उत्पादन करणे बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी आयोजित केलेली आहे. याबाबतचे सादरीकरण/आराखडा येथे मांडलेला आहे. सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी दरम्यान नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्न/सूचना/टिका यांची येथे नोंद घेतलेली आहे. यामध्ये काही नागरिकांचे प्रकल्पाला विरोध आहे तर काही नागरिकांचे प्रकल्पाला समर्थन आहे. या सर्व आक्षेप/टिका यांची नोंद घेण्यात आली आहे व याचा सविस्तर रीतीने इतिवृत्तात समाविष्ट करण्यात येईल. तदनंतर शेवटी त्यांनी उपस्थित सहभागींचे आभार मानून प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी समाप्त झाली असे जाहीर केले.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानून जाहीर लोकसूनावणी संपन्न झाली.

| | | |
|---|---|---|
| **सो. म. कुरमुडे**<br>(समन्वयक)<br>तथा<br>उप प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, जालना. | **सुजित ढोलम**<br>(सदस्य)<br>तथा<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजी नगर. | **केशव नेटके**<br>(अध्यक्ष)<br>तथा<br>अप्पर जिल्हादंडाधिकारी जालना. |